महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. ६९८५२२००
सी. आय. एन. नं.:U40109MH2005SGC153645

जा.क्र. औसंवि/अ/मानक बोली दस्ताऐवज/३४६१८ दिनांक : २८/१०/२०२५

# परिपत्रक

विषय : कंत्राटी पध्दतीवर बाहयस्त्रोत कंत्राटी कामगारांच्या सेवा घेण्यासंदर्भात Standard Bidding Document (SBD) मध्ये सुधारणा करणेबाबत.

संदर्भ : १. SBD परिपत्रक क्र. IR/A/SBD/२९३८१ दि. २३/१०/२०१९.
२. SBD सुधारीत परिपत्रक क्र. औसंवि/अ/मानक बोली दस्ताऐवज /००६७१ दि. ०६/०१/२०२५.

************

सांघिक कार्यालयाचे संदर्भ क्र.१ च्या परिपत्रकान्वये महावितरण कंपनीतील विविध कार्यालयात कंत्राटदारामार्फत कंत्राटी कामगारांची सेवा घेण्यासंदर्भात ई-निविदा काढण्याची प्रक्रीयेतील अटी व शर्तीमध्ये एकसमानता राहावी या दृष्टीने मानक बोली दस्ताऐवज (SBD) प्रसारीत करण्यात आले होते.

२. महावितरण कंपनीतंर्गत विविध कार्यालयात मनुष्यबळ पुरवठा करण्याकरीता ई-निविदा प्रसारीत करतांना अनेक अडचणी व समस्यांना सामोरे जावे लागत असल्यामुळे संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकान्वये, मानक बोली दस्ताऐवज (SBD) मधील प्रचलित तरतूदींमध्ये नविन अटींचा समावेश / सुधारणा करण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली होती. तथापि, संदर्भ क्र. २ चे परिपत्रक क्र. औसंवि/अ/मानक बोली दस्ताऐवज/००६७१ दि. ०६/०१/२०२५ अन्वये SBD मध्ये करण्यात आलेल्या सुधारणांपैकी काही मुद्यांच्या बाबतीत क्षेत्रिय कार्यालयांकडून मार्गदर्शन करण्याबाबत विनंती करण्यात आली असून, त्यानुसार Standard Bidding Document (SBD) मध्ये करण्यात आलेल्या सदर मुद्यांबाबत सविस्तर सुचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहे.

३. कंत्राटी कामगारांचा कामावर असतांना अपघात होवू नये यादृष्टीने कंत्राटी कामगारास विशिष्ट प्रकारची मानके असलेली सुरक्षा साधने उपलब्ध करून देण्याकरीता कंत्राटदारास देण्यात येणाऱ्या रकमेमध्ये मुळ वेतनाच्या फक्त **२% (दोन टक्के)** रक्कम दरमहा अतिरिक्त अदा करण्याबाबत तरतूद करण्यात आली आहे. कंत्राटदारांनी सदर तरतूदीनुसार कंत्राटी कामगारास विशिष्ट प्रकारची मानके असलेली सुरक्षा साधने उदा. पक्कड, हॅण्डग्लोज, स्क्रुड्रायव्हर, टेस्टर इत्यादी प्राधान्याने उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त आहे. तसेच, संबंधित कंत्राटी कामगारास विशिष्ट प्रकारची मानके असलेली सुरक्षा साधने उपलब्ध करून दिल्याबाबतची नोंद असलेल्या रजिस्टरची प्रत संपर्क पोर्टल मध्ये अपलोड करणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे ज्या कंत्राटदार संस्थांनी सुरक्षा साधने वितरीत केलेली आहेत अशा संस्थेस पुढील ई-निविदेमध्ये प्राधान्य देण्यात यावे व ज्या संस्थेने कंत्राटी कामगारांना सुरक्षा साधने वितरीत केलेली नाहीत अशा संस्थांना तांत्रिक निविदेमध्ये अपात्र करण्यात यावे, अशी अट ई-निविदेमध्ये अंतर्भूत करण्यात यावी.

४. महावितरण कंपनीचे परिपत्रक क्र. औसंवि/अ/मानक बोली दस्तऐवज/००६७१, दि. ०६/०१/२०२५ नुसार ज्या कंत्राटदार संस्था कंत्राटी कामगारांचे मासिक वेतन राष्ट्रीयकृत बँका / शेड्युल बँकेतील वेतन खात्यामध्ये जमा करतील अशा कंत्राटदार संस्था पुढील ई-निविदा प्रक्रियेत तांत्रिक निविदा करीता पात्र राहतील.

५. सबब, उपरोक्त अटी व शर्तीचा समावेश ई-निविदा दस्तऐवजामध्ये करण्यात यावे. सदर परिपत्रक महावितरण कंपनीच्या Employee Portal या संकेतस्थळावर Industrial Relations Department येथे प्रसिद्ध करण्यात आले आहे.

(परेश भागवत)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत :-**

१. प्रेषण यादीप्रमाणे महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता व तत्सम स्तरापर्यंत.
२. मुख्य महाव्यवस्थापक (मा.व तं.), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
३. उप महाव्यवस्थापक (मा.व तं.- संपर्क पोर्टल), महावितरण, सांघिक कार्यालय, मुंबई.
 - **संपर्क पोर्टलमध्ये उपरोक्तपणे नविन अटींचा समावेश / सुधारणा करण्याबाबत योग्य कार्यवाही करावी.**

D:\SSPisey 3\OUTSOURCING\Tender.docx